॥ सा विद्या या विमुक्तये ॥

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड - ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

# SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA

Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade

आज़ादी का अमृत महोत्सव

## ACADEMIC (AFFILIATION) SECTION

Phone: (02462) 215242 (Ext. - 152)
Fax:(02462) 215572

Website: srtmun.ac.in
email: affiliation@srtmun.ac.in

बी.सी.ए.,बी.बी.ए., बी.एम.एस., बी.डिझाईन व बॅचलर ऑफ फॅशन डिझाईन या अभ्यासक्रमांच्या मान्यता व प्रवेशा बाबत.

:: महत्वाचे व तातडीचे परिपत्रक ::

संदर्भ :–१. मा. मनिष जोशी, सचिव, विश्वविद्यालय अनुदान आयोग यांचे पत्र क्र. D.O.No.2-79/2023 (CPP-II), दि. ०८ जानेवारी २०२४.

२. मा. संचालक, तंत्रशिक्षण महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे पत्र क्र. ०२/एन.जी.सी./मान्यr/BBA, BMS, BCA / 2024/27, दि. १७ जानेवारी, २०२४.

३. कक्ष अधिकरी, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांनी पाठविलेले पत्र दि. ०३/०२/२०२४.

४. या विभागाचे परिपत्रक कं. शैक्षणिक/संलग्न–०३/२०२३–२४/१५५५, दि. ०६/०२/२०२४.

५. या विभागाचे परिपत्रक कं. शैक्षणिक/संलग्न–०३/२०२३–२४/१६३६, दि. १०/०२/२०२४.

६. पत्र क्र. उशिप्र–११२४/प्र.क्र.११/सीईटी–२०२४/१०१९/२०२४, दि. २०/०६/२०२४.

७. या विभागाचे परिपत्रक कं. शैक्षणिक/संलग्न–०३/२०२४–२५/६१, दि. २१/०६/२०२४.

सर्व संलग्नीत महाविद्यालयांना सुचित करण्यात येते की, सचिव, विश्वविद्यालय अनुदान आयोग, नवी दिल्ली यांचे उपरोक्त सदर्भीय क्र.०१ दि. ०८ जानेवारी, २०२४ चे पत्र तसेच संचालक, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन मुंबई यांचे उपरोक्त सदर्भीय क्र. ०२ दि. १७ जानेवारी २०२४ रोजीच्या पत्रान्वये निर्देशित केल्याप्रमाणे शैक्षणिक वर्ष २०२४–२५ पासून प्रस्तूत विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालयात चालणा–या बी.बी.ए., बी.सी.ए., बी.एम.एस., बॅचलर ऑफ डिझाईन व बॅचलर ऑफ फॅशन डिझाईन या अभ्यासक्रमांचे प्रवेश हे अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद (AICTE), नवी दिल्ली यांचे मार्फत नियंत्रीत (Regulate) केले जाणार आहेत. त्यामुळे उपरोक्त अभ्याक्रमांचे प्रवेश अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद (AICTE) नवी दिल्ली यांनी दिलेल्या निर्देशाप्रमाणे करण्यात यावे तसेच उपरोक्त अभ्यासक्रमाच्या मान्यतेबाबत या विभागाचे उपरोक्त संदर्भीय परिपत्रक क्र. ४, ५ व ७ अन्वये सर्व संबंधित महाविद्यालयांना कार्यवाही करणेबाबत कळविण्यात आलेले होते. त्यानुसार सर्व संबंधित महाविद्यालयांनी कार्यवाही करावी. तसेच संदर्भिय पत्र क्र. ६ च्या वरील अभ्यासक्रमाच्या प्रवेशा बाबत राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष महाराष्ट्र शासन हे लवकरच अतिरिक्त सामाईक प्रवेश परीक्षा घेण्यात येणार आहे असे कळविले आहे, ही बाब सर्व संबंधित विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून द्यावी. असेही यापुर्वी कळविण्यात आलेले होते. परंतु अद्याप प्रस्तुत विद्यापीठाशी संलग्नीत बहुतांश महाविद्यालयानी विद्यापीठाचे नाहरकत प्रमाणपत्र घेतलेले नाहीत. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद (AICTE), नवी दिल्ली यांची मान्यता प्रक्रिया केलेली नाही.

सबब, आपणास मा. कुलगुरु महोदयांच्या मान्यतेने पुनश्च कळविण्यात येते की, ज्या महाविद्यालयाकडे बी.बी.ए., बी.सी.ए., बी.एम.एस., बॅचलर ऑफ डिझाईन व बॅचलर ऑफ फॅशन डिझाईन हे अभ्यासक्रम सुरु आहेत परंतु त्यांनी ए.आय. सी.टी.ई. कडे नोंदणी केलेली नाही अशा बी.बी.ए., बी.सी.ए., बी.एम.एस., बॅचलर ऑफ डिझाईन व बॅचलर ऑफ फॅशन डिझाईन अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयांनी ए.आय.सी.टी.ई. नवी दिल्ली, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई, मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांची मान्यता घेवून त्यानुसार प्रस्तूत विद्यापीठाचे संलग्नीकरण प्राप्त करुन घ्यावे. वरील प्रमाणे सर्व

मान्यता व प्रस्तूत विद्यापीठाचे संलग्नीकरण न घेता परस्पर विद्यार्थी प्रवेशीत करु नयेत अन्यथा विद्यार्थी प्रवेशित केल्यास व प्रवेशीत विद्यार्थ्यांना भविष्यात कायदेशिर, तांत्रीक, आर्थीक अडचणी निर्माण झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित संस्था/महाविद्यालयाची राहील याची नोंद घ्यावी.

सदर परिपत्रक हे विद्यापीठाच्या www.srtmu.ac.in या संकेतस्थळावर affiliation या शिर्षकांतर्गत प्रसिध्द करण्यात येत आहे.

''ज्ञानतीर्थ'', परिसर,
विष्णूपुरी, नांदेड–४३१ ६०६
जा.क्र.शैक्षणिक/संलग्न–०३/२०२४–२०२५/560
दिनांक :– १३/०८/२०२४

उपकुलसचिव
शैक्षणिक (संलग्नीकरण) विभाग

**प्रत माहिती तथा योग्य त्या कार्यवाहीस्तव :–**

१. मा. अध्यक्ष/सचिव, सर्व संबंधित संलग्नीत महाविद्यालयाचे संस्था.
२. प्राचार्य, सर्व सलग्नीत संबंधीत महाविद्यालये, प्रस्तूत विद्यापीठ.
३. प्र. संचालक, परिक्षा व मुल्यमापन मंडळ, प्रस्तूत विद्यापीठ
४. उपकुलसचिव, पात्रता विभाग, प्रस्तुत विद्यापीठ, यांना देवून कळविण्यात येते की, वरील प्रमाणे नोंद घेवून कृपया ए.आय.सी.टी.ई ची मान्यता प्राप्त झाल्यानंतर उपरोक्त अभ्यासक्रमांचे पात्रता आवेदनपत्र स्विकारावे.
५. सिस्टीम एक्सपर्ट, शैक्षणिक (संलग्नीकरण) विभाग, प्रस्तुत विद्यापीठ यांना देऊन कळविण्यात येते की, सदर परिपत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर Affiliation या शिर्षकांतर्गत प्रसिध्द करावे.